MANJARA CHARITABLE TRUST'S

SMT. SUSHILADEVI DESHMUKH SENIOR COLLEGE, LATUR

DEPARTMENT OF POLITICAL SCIENCE

Project work /Field Work

(2022-2023)

# INDEX



| Sr.NO | Content |
| --- | --- |
| 1. | Introduction -objectives & outcomes |
| 2. | Notice |
| 3. | Students List (With Project Guide) |
| 4. | Distribution of Topic |
| 5. | Project Work on<br>1)"Empowerment of Rural Women and Social Development"<br>2)"Women's Political Participation and Women's Empowerment"<br>3) "73rd Constitutional Amendment and Role of Gram Sabha"<br>4) "Pandit Jawaharlal Nehru's Thoughts on Secularism". |
| 6. | Summary Report |
| 7. | Certificate |



Scanned with OKEN Scanner

LATUR

# Introduction –Objectives & Outcomes

## 1 ) Secular Thought of Pandit Jawaharlal Nehru

### Objectives:

1 ) To examine whether the concept of secularism has taken root in Indian society.

2 ) To introduce the thought of Pandit Jawaharlal Nehru

### Outcomes:

1 ) Secular ideas are rooted.

2 ) Secular thought has spread.

## 2 ) 73rd Constitutional Amendment and Role of Gram Sabha

### Objectives:

1 ) To study the function and authority of Gram Sabha.

2 ) To understand the structure of Gram Sabha.

3 ) Providing information about various government schemes.

### Outcomes:

Scanned with OKEN Scanner

1 ) Participation of villagers in Gram Sabha increased.

2 ) Participation of women in decision making process has not increased.

3 ) There is lack of information about various government schemes.

LATUR

### 3 ) Rural Women Empowerment and Social Development

## Objectives:

1 ) To know the economic status of women.

2 ) To know the social status of women.

3 ) To study political participation of women.

## Outcomes:

1 ) Social and economic development of women has been achieved.

2 ) Women's political participation has increased.

3 ) Lack of women empowerment.

### 4 ) Women's political participation and women's empowerment

## Objectives:

1 ) To study the political and economic status of women.

2 ) To study the political participation of women.

## Outcomes:

1 ) Lack of participation of women in decision making process.

2 ) The goal of 73rd and 74th constitutional amendment has been fulfilled.

Scanned with OKEN Scanner

# Notice

Date: 10/08/2022

This is to inform to all the students of B.A.FY,BASY & BATY that those students who want to participate in project work in Political Science are infomed to make contact with project guides of English as mentioned below and register their names for project work before 13/08/2022.

For further queries,Contact-

1) Mr.Shivaji Mohale
2) Mr.Shankar Chavan

Head

Department of Political Science

PRINCIPAL
Smt. Sushiladevi Deshmukh
Senior College, LATUR

Scanned with OKEN Scanner

# Enrollment of Student

| Sr.no | Students Name | Class | Signature |
|---|---|---|---|
| 1 | SHAIKH ALTAF DAGDU | BATY | [illegible] |
| 2 | GAIKWAD MAYUR RAJKUMAR | • | Mayur |
| 3 | SHAIKH NEHA YUNUS | • | Neha |
| 4 | UPHADE DHANSHRI SHIVRAJ | • | Dhanshri |
| 5 | PHULE ANIKET GOVIND | • | Aniket |
| 6 | BHADANGE VISHNU BAPURAV | BATY | [illegible] |
| 7 | THAKUR RAJNANDINI MAHADEV | • | [illegible] |
| 8 | SUVARNKAR BALAJI BHARAT | • | SUVARNKAR |
| 9 | KAMBLE SHAILESH SOMNATH | • | Kamble |
| 10 | PATHAN IRFAN ASLAM | • | Pathan |
| 11 | SALGAR VAISHNAVI BALAJI | BASY | VAISHNAVI |
| 12 | SARWADE KETEN RAVI | • | [illegible] |
| 13 | SAYYAD AYYUB SAMEER | • | Ayyub |
| 14 | SAYYED MUBSHIR MASOODALI | • | [illegible] |
| 15 | SHAIKH BABLU DAGDU | • | SHAIKH |
| 16 | KAMBLE ARVIND GOPAL | BATY | [illegible] |
| 17 | GHODKE ASHISH BABURAO | • | ASHISH |
| 18 | JADHAV ASHISH RAJPAL | • | Ashish |
| 19 | GIRI BHAGYASHRI GULABRAO | • | GIRI |

LATUR

LATUR

# Distribution of Project Topics

| Sr.no | Students Name | Class | Name of the Topic | Name of Guide |
|---|---|---|---|---|
| 1 | SHAIKH ALTAF DAGDU | BAFY | "Empowerment of Rural Women and Social Development" | Mr Shivaji Mohale<br>Mr Shankar Chavan |
| 2 | GAIKWAD MAYUR RAJKUMAR | " | " | " |
| 3 | SHAIKH NEHA YUNUS | " | " | " |
| 4 | UPHADE DHANSHRI SHIVRAJ | " | " | " |
| 5 | PHULE ANIKET GOVIND | " | " | " |
| 6 | BHADANGE VISHNU BAPURAV | BAFY | "Women's Political Participation and Women's Empowerment" | Mr Shivaji Mohale<br>Mr Shankar Chavan |
| 7 | THAKUR RAJNANDINI MAHADEV | " | " | " |
| 8 | SUVARNKAR BALAJI BHARAT | " | " | " |
| 9 | KAMBLE SHAILESH SOMNATH | " | " | " |
| 10 | PATHAN IRFAN ASLAM | " | " | " |
| 11 | SALGAR VAISHNAVI BALAJI | BASY | "73rd Constitutional Amendment and Role of Gram Sabha" | Mr Shivaji Mohale<br>Mr Shankar Chavan |
| 12 | SARWADE KETEN RAVI | " | " | " |
| 13 | SAYYAD AYYUB SAMEER | " | " | " |
| 14 | SAYYED MUBSHIR MASOODALI | " | " | " |
| 15 | SHAIKH BABLU DAGDU | " | " | " |
| 16 | KAMBLE ARVIND GOPAL | BATY | "Pandit Jawaharlal Nehru's Thoughts on Secularism". | Mr. Shivaji Mohale<br>Mr Shankar Chavan |
| 17 | GHODKE ASHISH BABURAO | " | " | " |
| 18 | JADHAV ASHISH RAJPAL | " | " | " |
| 19 | GIRI BHAGYASHRI GULABRAO | " | " | " |

LATUR

MANJARA CHARITABLE TRUST'S

SMT. SUSHILADEVI DESHMUKH SENIOR COLLEGE, LATUR

DEPARTMENT OF ENGLISH

**Project work**

**Summary Report**

| Project Work | |
|---|---|
| Department: **Political Science** | Academic Year: **2022-23** |
| No. of Students Enrolled: **15** | Project Guides: 1)Mr.Shivaji Mohale<br>2) Mr.Shankar Chavan |
| Duration of the Programme: **One Month** | Duration: **14/08/2022 to 14/09/2022** |
| Assesed by concerned project guides | |

Department of English has conducted 'Project Work in Political Science ' in the academic year 2022-2023.The project work was distributed among 19 students from B.A. programme. The project work was divided into four different topics related with English. The students have been allotted three project guides for their convenience. The students underwent project work in collaboration with other students. Students expressed that working together to complete the project was an incredible experience for them all. Within the allotted time, every student successfully finished their project work.

**Head of the Department**

PRINCIPAL
Smt. Sushiladevi Deshmukh
Senior College, LATUR

Scanned with OKEN Scanner

# श्रीमती सुशीलादेवी देशमुख वरिष्ठ महाविद्यालय लातूर

शैक्षणिक वर्ष 2022-2023

राज्यशास्त्र विभाग

प्रकल्प लेखन

प्रकल्पाचे शिर्षक

## ग्रामीण महिला सक्षमीकरण आणि सामाजिक विकास


**मार्गदर्शक**

प्रा. शिवाजी मोहाळे

प्रा. शंकर घव्हाण

प्रकल्प लेखनकार

बी.ए.प्रथम वर्षाचे विद्यार्थी

1 ) अल्ताफ शेख

2 ) मयुरी गायकवाड

3 ) नेहा शेख

4 ) ज्ञानेश्वरी उफाडे

5 ) अनिकेत फुले


Scanned with OKEN Scanner

3 ) ग्रामीण महिला सक्षमीकरण आणि सामाजिक विकास

उद्देश :-

1 ) महिलांचे आर्थिक स्थिती जाणून घेणे.

2 ) महिलांचे सामाजिक स्थिती जाणून घेणे.

3 ) महिलांचा राजकीय सहभागाचा अभ्यास करणे.

निष्कर्ष :-

1 ) महिलांचा सामाजिक व आर्थिक विकास साध्य झाला आहे.

2 ) महिलांचा राजकीय सहभागत वाढ झाली आहे.

3) महिला सक्षमीकरणाचा आभाव आहे.

LATUR

Scanned with OKEN Scanner

# "ग्रामीण महिला सक्षमीकरण आणि सामाजिक विकास"

अल्ताफ शेख,मयुरी गायकवाड,नेहा शेख,ज्ञानेश्वरी उफाडे,अनिकेत फुले ( बी.ए.प्रथम वर्ष )

LATUR

**प्रस्तावना:-**

अलीकडील काळामध्ये महिला सक्षमीकरण हा विशय एक महत्वाचा मुद्दा म्हणून समोर आला आहे. वास्तविक पाहता स्त्री-पुरुश यांच्यामध्ये नैसर्गिक प्रकृती भिन्नता वगळता इतर विशेश असा फरक नाही. एकमेकांना पुरक अशी समाज जिवनातील ती दोन अंग आहेत. तरी परंतु स्त्री ही जीवनभर पुरुशाच्या अधीन कशी राहिल हेच पाहण्यात आले. प्राचीन काळापासून महिलाचे अस्तीत्व जाणून घेतल्यास असे दिसून येते की, महिलांच्या वाटयाला आलेल्या मर्यादित भूमिका, अज्ञानामुळे आत्मविश्वासाचा अभाव व ठराविक स्वरुपाचे सरकार या सर्व बाबी त्यांच्या विकासातील अडसर ठरल्या. आधुनिक काळात स्त्री सक्षमीकरणासाठी जागतिक पातळीवर, देषपातळीवर, राज्यपातळीवर, गावपातळीवर, शासकीय, प्रशासकीय,

सामाजिक, राजकिय घटनात्मक अषा अनेक क्षेत्रात तरतुदी करुन त्यांची काटकोरपणे अंमलबजावणी करुन स्त्री ही पुरुशाच्या बरोबरीने कार्य करण्यासाठी सक्षम आहे हे त्यांच्या अलीकडील काळात दिसून येत आहे. प्रास्तावना: प्राचीन काळापासून पुरुशप्रधान संस्कृतीच्या वरवंटयाखाली भरडल्याजाणाऱ्या महिलांना सामाजिक आर्थिक व राजकीय स्वातंत्र्य समता आणि प्रतिश्ठा प्राप्तकरुन देण्यासाठी स्वातंत्र्यपूर्व काळात भारतीय समाजसुधारणा करणे व स्वातंत्र्यानंतर भारत सरकारने मोलाची भूमिका पार पाडली आहे. भारतीय राज्यघटनेतील तरतुदींना अनुसरुन देषातील ग्रामीण महिलांच्या सबलीकरणासाठी विविधयोजना तयार करुन त्यांची अंमलबजावणी केली आहे. त्यामुळेच आज काही प्रमाणात

महिलांच्या सामाजिक, आर्थिक व राजकिय सक्षमीकरणास चालना मिळत असल्याचे दिसून येते.

ग्रामीण महिला आणि पंचायत राज: स्त्रीयांसाठी सर्वात मोठा अडथळा म्हणजे पुरुशवर्गाचे अधिकारगाजवण्याची वृत्ती हा आहे. त्यामुळे स्त्रीयांना राजकिय अधिकार सत्तापदे मिळाली नाही आणि स्त्रीवर्गाच्या विकासाला पुरुशवर्गाचा मनापासून पाठिंबा मिळाला नाही. स्थानिक प्रषासनात महिलांच्या परिस्थीतीत बदल घडवण्यासाठी 1993 मध्ये 73 वी घटनादुरुस्ती झाली. या घटनादुरुस्तीनुसार भारतात पंचायतराजसंस्थामध्ये महिलांसाठी 1/3 म्हणजेच 33 टक्के पेक्षा कमी नाही इतक्या जागा आरक्षित ठेवण्यात आल्या आणि स्त्रियांचा राजकारणात कायदेषीर प्रवेषाचा मार्ग मोकळा झाला. तर दुसऱ्या बाजूने त्यांच्यातील उदासिनता, निश्क्रियता यांचे उच्चाटण होवून महिलांमध्ये एक प्रकारची जाणीव-जागृती निर्माण झालेली आहे. महाराश्ट्रात जिल्हापरिशदांमध्ये 1962 पासून पंचायतराज कार्यान्वित आहे. स्थानिक प्रषासनाच्या उद्देषाने प्रेरित होऊनही लोकषाही विकेंद्रीकरणातून या पंचायतराज्यातील त्रिस्तरीय रचनेमध्ये जिल्हापरिशद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायत या संस्थामधून अनेक विविध उपक्रम महाराश्ट्रातील पंचायतराज राबवित आहे तर महिलाही काही उपक्रम राबवित आहेत. व स्वतंत्रपणे कार्य करीत आहेत. केवळ चुल आणि मुल न सांभाळता त्या राजकारण आणि प्रषासनाकडे वळत आहेत. महिलांचा हा दर्जा 73 व्या घटनादुरुस्तीनुसार सुधारलेला दिसून येतो. उदा. महानगरपालिकेचे अध्यक्षस्थान तसेच पंचायत समिती सभापती, ग्रामपंचायतीच्या सरपंच, षिक्षणाच्या क्षेत्रातही महिलांनी मोठी झेप घेतलेली आहे.

Scanned with OKEN Scanner

भारतीय राजकारणात महिलांचा सहभाग: स्वातंत्र्यपूर्व काळापासून भारतीय राजकारणात महिलांचा सहभाग दिसून येतो उदा. महाराणीलक्ष्मीबाई, झाशीचीराणी, अहिल्याबाई होळकर, रझियासुलतान, राणीताराबाई, चांदबीबी या महिला आपल्या प्रयत्नातून स्वातंत्र्यपूर्व काळात सत्तेवर आल्या होत्या. यांचीच प्रेरणा घेवून भारतीय राजकारणात भारतीयमहिला यामध्ये सरोजनी नायडू, कमला नेहरु, राजकुमारी अमृता कौर, उशामेहता, अरुणा असफअली यासारख्या महिला भारतीय आंदोलनात अग्रभागी होत्या.

आपल्या हिमतीने व स्वकतृत्वाने षासन व प्रषासनातील उच्च पदे प्राप्त करुन महिला या पुरुशांपेक्षा कोणत्याही बाबतीत कमी नाहीत हे सिध्द करुन दाखविले आहे. यामध्ये प्रामुख्याने विजयालक्ष्मी पंडीत (युनो प्रतिनिधीत्व), सुचेता कृपलानी (उत्तर प्रदेषच्या मुख्यमंत्री), नदिनी सत्पथी (ओरिसाच्या मुख्यमंत्री), इंदिरा गांधी (भारताच्या पंतप्रधान), प्रतिभा पाटील (भारताच्या राश्ट्रपती), राबडीदेवी (बिहारच्या मुख्यमंत्री), जयललीता (तामीळनाडूच्या मुख्यमंत्री), ममता बॅनर्जी (प. बंगालच्या मुख्यमंत्री) याषिवाय सोनिया गांधी, मनेका गांधी, सुशमा स्वराज, गिरीजाव्यास, उमाभारती, विजयाराजेषिंदे, षिलादिक्षीत अषा अनेक महिलांचा समावेष आहे कि ज्यांनी भारतीय राजकारणात व प्रषासनात, समाजकारणात महत्वाचे बदल केले आहेत.

स्थानिक स्वराज्य संस्थेतील महिला नेतृत्व: भारतातील स्थानिक स्वराज्यसंस्था प्राचीन काळापासून अस्तित्वात आहेत. या

संस्थांच्या संदर्भात स्वातंत्र्यपूर्वकाळात व स्वातंत्र्यकाळातही अनेक कायदे संमत करण्यात आले. या कायदयामध्ये महिलांसाठी

आरक्षण ठेवल्याचा फारसा उल्लेख सापडत नाही. 1957 मध्ये केंद्रसरकारने स्थापन केलेल्या श्री. बलवंतराय मेहता समितीने

स्थानिक स्वराज्यसंस्थामध्ये दोन महिला प्रतिनिधीची तरतूद केली होती मात्र खऱ्या अर्थाने आरक्षणाची सुरुवात कर्नाटक जिल्हापरिशद, तालुका पंचायत समिती, मंडळ पंचायत आणि नविनपंचायत अधिनियम 1983 नुसारच झाली असे म्हणावे लागेल. कारण या अधिनियमातील तरतूदीनुसार 25 टक्के जागा आरक्षित ठेवण्यात आल्या. पंचायतराजसंस्थेमध्ये महिलाप्रतिनिधीत्व आरक्षणाच्या माध्यमातून निष्चित करणे गरजेचे होते. 1989 मध्ये 64 वी राज्यघटनादुरुस्ती विधेयक संसदेसमोर मांडण्यात आले. मात्र हे विधेयक मंजूर होवू षकले नाही. इ.स. 1991 पूर्वी कर्नाटक,

ओरिसा, केरळ आणि महाराश्ट्र या चार राज्यांनी महिलांसाठी 30 टक्के आरक्षणाची तरतूद केली. 73 व्या घटनादुरुस्तीपूर्वी या चार राज्यात आरक्षण होते. 73 व्या व 74 व्या राज्यघटनादुरुस्तीनंतर भारतीय संविधानात दुरुस्ती करुन 33 टक्के महिला आरक्षणाची तरतूद केली. फेब्रुवारी 1997 मध्ये नवी दिल्ली येथील सामाजिक विज्ञान संस्थेने प्रकाषित केलेल्या आकडेवारीनुसार भारतात स्थानिक स्वराज्यसंस्थामध्ये सर्वात जास्त महिला प्रतिनिधी असणारे राज्य मध्यप्रदेष आहे, दुसऱ्या क्रमांकाचे राज्य उत्तर प्रदेष, तिसऱ्या क्रमांकाचे राज्य आंध्रप्रदेष व चौथा क्रमांक महाराश्ट्राचा लागतो.

2001 च्या जनगणनेनुसार आरक्षणाच्या धोरणामुळे महाराश्ट्रात 18286 महिला स्थानिक स्वराज्यसंस्थाच्या राजकारणात सक्रिय झाल्या. महिला सरपंचासाठी 1993 जागा, पंचायतसमिती सभापतीसाठी 100 जागा तर जिल्हापरिशद अध्यक्षासाठी 10 जागा राखीव होत्या. महाराश्ट्राच्या ग्रामीण 9193 महिला सरपंचापैकी 1067 अनुसुचित जातीच्या महिला

LATUR

Scanned with OKEN Scanner

सरपंच, 1211 अनुसूचित जमातीच्या महिला सरपंच, 2483 इतर मागासवर्गीय महिला सरपंच आणि 4432 खुल्या गटातील महिला सरपंच अशी आकडेवारी दिसून आली.

पूर्वी महिला सक्रिय राजकारणापासून पूर्णतः अलिप्त राहात होत्या. मात्र आरक्षणामुळे हळुहळु त्या या प्रक्रियेत रूळु लागल्या आहेत. पदाधिकारी महिला असल्यास सामान्य महिलांना त्यांच्याशी संपर्क करणे सोपे जाते. महिला पदाधिका-याशी त्या दिलखुलास बोलू षकतात. त्यामुळे त्यांच्या समस्या जाणून घेणे सोपे जाते. आरक्षणामुळे निवडून गेलेल्या महिला अधिक महत्वाचे कार्य करतात. याची जाणीव सामान्य महिलांना असल्याचे दिसते याचे कारण म्हणजे निर्वाचित महिलांच्या समाजातील मान, सन्मान पाहून तसेच त्यांना मिळालेले अधिकार पाहून या महिला आपल्यापेक्षा महत्वाचे काम करतात व त्यांचे स्थानही महत्वाचे आहे. त्यामुळे सामान्य महिलांना अषा निर्वाचित महिलांच्या वेगळेपणाचे त्यांच्या अधिकार व कार्याची जाणीव होत असल्याचे दिसते. पंचायतराज संस्था स्थानिकपातळीवरील असल्यामुळे स्थानिक समस्या सोडवण्यासाठी जबाबदारी त्यांच्यावर आहे. आरक्षणामुळे पंचायतराज संस्थातील महिलांचे प्रमाण वाढले. त्या पदाधिकारी पदावर जाऊन बसल्या व त्यांनी आतापर्यंत बऱ्याच महिलांकडे विकासाच्या दृष्टीने लक्ष दिले आहे.

**सारांश :-**

स्थानिक स्वराज्य संस्थेत महिलांना 50 टक्के आरक्षण देणारे भारत जगातील एकमेव राष्ट्र आहे. स्थानिक स्तरावरील सर्व प्रष्नांची सोडवणूक करण्यासाठी निर्णय प्रक्रिया व विकास विशयक कार्यात महिलांचा सहभाग वाढविल्यास महिलांच्या सबलीकरणाबरोबरच नागरीभागाचा विकास जलद होतो. संघटना कुठलीही असो षासन व प्रषासन चालविण्यासाठी नेता व नेतृत्व अत्यंत महत्वाचे असते. कारण संपूर्ण व्यवस्थेचे यष व अपयष नेतृत्वावर अवलंबून असते. मराठीभाषेतील सबलीकरण हा षब्द म्हणून वापरला जातो परंतू सबलीकरण या षब्दात बळाचा वापर किंवा अन्यायाचा प्रतिकार बळाने करणे असा अर्थ होत आहे तर सक्षमीकरणाच्या षब्दात कोणताही षत्रू ठरवण्यात येत नाही अर्थात सक्षमीकरण म्हणजे अंगभूत गुणांचा विकास होय म्हणून सबलीकरण या षब्दापेक्षा सक्षमीकरण हा षब्द योग्य वाटतो. निर्बलांचा विकास करणे ही एक प्रक्रिया आहे. अधिका-यांनी प्रषासकीय कामकाजातील लालफीत व इतर दप्तर दिरंगाईत न अडकता महिला लाभधारकांच्या मनात ग्रामीण विकासाबद्दल प्रेरणा, उत्साह व त्यांचे मनोबल उंचावणारा ग्रामीण विकासासाठी पोशक वातावरण अधिकाधिक कसे निर्माण होईल असे चित्र निर्माण करावे. स्थानिक स्वराज्य संस्थेत महिलांना दिलेले 50 टक्के आरक्षण हे देषाच्या विकासातील एक मोठे पाऊल ठरेल यात षंका नाही.

Scanned with OKEN Scanner

MANJARA CHARITABLE TRUST'S

**SMT. SUSHILADEVI DESHMUKH SENIOR COLLEGE, LATUR**

## Project Work / Field Work

### *Certificate*

**This is to certify that,**

**Mr./Mrs.** Aslef Shaikh, Mayur Gaikwad, Neha Shaikh, Dhanshri Uphade, Aniket Phule

**has successfully completed the Project Work/ Field Work entitled**

" Empowerment of Rural Women and Social Development "

**Conducted by the Department of** political Science **in the academic year 2022-23.**

**Project Guide**

**Head of the Department**

Scanned with OKEN Scanner

# श्रीमती सुशीलादेवी देशमुख वरिष्ठ महाविद्यालय लातूर

शैक्षणिक वर्ष 2022-2023

राज्यशास्त्र विभाग

प्रकल्प लेखन

प्रकल्पाचे शिर्षक

## महिलांचा राजकीय सहभाग आणि महिला सशक्तीकरण

मार्गदर्शक

प्रा. शिवाजी मोहाळे

प्रा. शंकर चव्हाण

प्रकल्प लेखनकार.

बी.ए.प्रथम वर्षाचे विद्यार्थी.

1 ) विष्णू भडंगे

2 ) राजनंदीनी ठाकूर

3 ) बालाजी सुवर्णकार

4 ) शैलेश कांबळे

5 ) इरफान पठाण

Scanned with OKEN Scanner

4 ) महिलांचा राजकीय सहभाग आणि महिला सशक्तिकरण

उद्देश

1 ) महिलांचे राजकीय व आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे.

2 ) महिलांच्या राजकीय सहभागाचा अभ्यास करणे.

निष्कर्ष

1 ) महिलांचा निर्णय प्रक्रियेतील सहभागाचा आभाव आहे.

2 ) 73 वी व 74वी घटना दुरुस्तीचे ध्येय पूर्ण झाले आहे.

LATUR

Scanned with OKEN Scanner

# महिलांचा राजकीय सहभाग आणि महिला सशक्तीकरण

विष्णू भडंगे,राजनंदीनी ठाकूर,बालाजी सुवर्णकार,शैलेश कावळे,इर्फान पठाण ( बी.ए.प्रथम वर्ष )

भारतीय राज्यघटना स्थानिक स्तरापासून ते राष्ट्रीय स्तरापर्यंत नागरिकांना सहभागी होण्याची संधी प्राप्त करून देते. त्यामुळे भारतीय स्त्रियांना नागरीकांच्या रूपात घटनात्मक आधारावर ही संधी सुरूवातीपासूनच प्राप्त आहे. परंतू राजकारणात सक्रिय सहभाग आणि राजकीय निर्णयप्रक्रियेत सहभाग मात्र स्वातंत्र्याच्या पाच दशकानंतर सुध्दा उल्लेखनिय स्वरूपात होऊ शकला नाही. खरे तर महिलांना निर्णय प्रक्रियेत पुढे येवू दिले तर त्यांच्या समस्यांना सोडविणे अधिक सोपे होईल. आर्थिक विकास आणि सामाजिक न्यायाच्या विविध कार्यक्रमांना संपादित करतांना महिलांच्या कृतिशिल क्षमतांचा सदुपयोग होवू शकतो. महिला सशक्तीकरणासाठी त्यांना निर्णयप्रक्रियेशी जोडणे आवश्यक आहे. हे निर्णय कुटूंबातील असोत किंवा शासकीय स्तरावरचे असोत. भारतीय संविधानाने स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीचे सर्व अधिकार व हक्क बहाल केले आहेत. परंतु पुरूषांनी ज्या प्रमाणे या संधीचा फायदा उचलला मात्र स्त्रियांनी तो फायदा करून घेतलेला नाही. आज साठ वर्षांच्या स्वातंत्र्यप्राप्तीच्या कालानंतर सुध्दा महिलांचे देशाच्या राजकारणात स्थान काय आहे? सर्वोच्च पद महिलांनी भुषवूनही त्यांच्या एकुणच राजकारणातील टक्केवारीत वाढ झाली आहे काय? महिलांनी राजकारणाला एक जबाबदार व सशक्त पिढी दिली आहे काय? दुर्दैवाने या सर्व प्रश्नांना नकारार्थीच उत्तरे येतात? जर काही स्त्रिया राजकारणात प्रवेश करतांना दिसत होत्या तर त्या पती व पिता यांच्या सहाय्याने येत होत्या. पतीचा मृत्यु किंवा पित्याचे निधन झाले तर सहानुभुतीचे वोट मिळावे म्हणून स्त्रिया स्वयंपाक घरातुन सरळ राजकारणात येत होत्या.

स्वातंत्र्यपूर्व काळात जेव्हा भारतात स्त्रियांच्या राजकीय सहभागाची प्रक्रिया सुरू केली गेली तेव्हा या प्रक्रियेला स्वातंत्र्यासाठी करण्यात येणाऱ्या संघर्षाच्या विकासासोबत जोडण्यात आले होते. यामुळे त्यांच्या राजकीय प्रवेशाला स्विकृती जरी मिळाली तरी परंपरागत पध्दतीने स्त्रियांना मागे ओढणाऱ्या शक्ती पूर्ण राहत नव्हत्या. भारतीय स्त्रियांना राजकीय अधिकार भारतीय पुरूषांच्या राजकीय महान नेतृत्वामुळे व अधिक संघर्ष न करता मिळाले असे म्हटले जाते उदा. भारतीय स्त्रियांना मत देण्याचा अधिकार सहज मिळाला आहे. परंतु मत देण्याच्या अधिकारासाठी 1917 मध्ये सोवियत रशिया या देशाने विनाशर्त महिलांना मतदानाचा अधिकार बहाल केला होता. इतर देशातही महिलांनी मोठ्या संख्येने मतदानाचा अधिकार मिळावा म्हणून आंदोलने सुरू केली होती. या सर्व परिवर्तनाचा भारतावर प्रभाव पडला व त्यामुळे भारतीय महिलांना त्याचा लाभ मिळाला आहे. कदाचित पाश्चिमात्य महिलांप्रमाणे त्यांना कठीण संघर्ष करावा लागला नाही परंतू स्वातंत्र्य संग्रामात मोठ्या संख्येने नोंदविलेला सहभाग आणि समानतेचा नियमित पुरस्कार करण्यामुळेच हे संभव होवू शकले.

कोणत्याही. देशाचा संपूर्ण विकास व्हावा असे वाटत असेल तर स्त्रियांना सहभागी करून घ्यावेच लागेल. स्वामी विवेकानंद म्हणतात की, ज्या प्रमाणे एका पंखाने चिमणी उडू शकत नाही त्याचप्रमाणे स्त्रियांच्या सहभागाशिवाय

LATUR

Scanned with OKEN Scanner

कोणतेच राष्ट्र प्रगती करू शकणार नाही. स्वातंत्र्यापूर्वी स्त्रियांना उपेक्षा, भेदभाव व शोषणाला बळी पडावे लागते परंतु स्वातंत्र्यानंतर मात्र भारत सरकारने स्त्रियांच्या स्थितीत सुधारणा करण्यासाठी अनेक योजना आणि वैधानिक अधिकारांना क्रियान्वीत केले. सरकारने राजकिय क्षेत्रात महिलांच्या योगदानाला सुनिश्चितARCH JOURN करण्यासाठी ग्यासाठी देशात पंचायती राज व्यवस्था आणि राजकारणातील आरक्षणाची तरतूद केली आहे.

73 वी आणि 74 घटनादुरूस्ती:- आंतरराष्ट्रीय महिला दशकामध्ये निवडणूकीतून स्थापन होणा-या संस्था आणि सार्वजनिक सेवांमध्ये स्त्रियांना आरक्षण हा सर्वात महत्वाचा मुद्दा झाला. सी. एस. डब्ल्यू. आय (कमिटी ऑन द स्टेट्स ऑफ वमेन इन इंडीया) च्या समितीच्या अहवालामुळे आरक्षणाच्या मुद्याला गती मिळाली. काही राजकिय पक्षांनी यावर एकमत दर्शविले की स्थानिक पातळीवरील प्रतिनिधी रचनांमध्ये म्हणजेच पंचायती राज संस्थामध्ये आरक्षण उपयुक्त, परिणामकारक, आवश्यक ठरेल. ग्रामिण स्त्रियांच्या दर्जामध्ये बदल आणि विकास घडवायचा असेल तर केवळ प्रतिकात्मक नव्हे तर अधिक प्रतिनिधित्व दयावे लागेल. म्हणून सी. एस. डब्ल्यू. आय. ने खेडयांच्या पातळीवर स्त्रि-पंचायतीची कायद्याने स्थापना व्हावी अशी जोरदार शिफारस केली. या पंचायती पचायतराज रचनेचा गाभा, व्यवच्छेदक भाग म्हणून काम करतील असेही नम्रपणे मांडले. 1980 च्या दशकात स्त्रियांसाठी आरक्षणाला पाठिंबा देण्यास सुरूवात केली. अशोक मेहता समितीच्या पंचायती राज्याच्या शिफारशींना प्रतिसाद देवून (भारत सरकार 1978) काही राज्यांनी म्हणेज कर्नाटक, प. बंगाल, आंध्र प्रदेश आणि महाराष्ट्र यांनी पुढाकार घेवून स्थानिक सरकारांना नवचैतन्य दिले आणि स्त्रियांच्या सहभागाची पातळी वाढविली.

1988 मध्ये नॅशनल पर्स्पॅक्टिव्ह प्लेन (एन. पी. पी.) ने सुचविले की, 30 टक्के जागा सरकारी समित्या / आयोग आणि स्थानिक संस्थामध्ये स्त्रियांसाठी राखून ठेवण्यात याव्या. एनपीपी ने अधिकारी स्तरांवर स्त्रियांना आरक्षण देण्याची शिफारस केली. त्याच प्रमाणे मागास जाती, जमाती आणि समाजातील दुर्बल विभागातील स्त्रिया या सर्वांना स्थानिक संस्थामध्ये उच्चपातळीवर आरक्षण देण्याची शिफारस केली. काही टक्के मतदार संघ फक्त स्त्रियांसाठी राखीव म्हणून जाहीर करण्यात, सांगण्यात आले. आणि सुचविण्यात आले की, तळागाळातील सरकारी अधिकाऱ्यांमध्ये 50 टक्के स्त्रिया असायला हव्यात. बरीचशी धुळ बसल्यानंतर 1989 मध्ये पंचायती राज मध्ये स्त्रियांसाठी आरक्षण प्रत्यक्ष अस्तित्वात आले. ज्याचा परिणाम असा झाला की, 64 वे घटनादुरूस्ती विधेयक ज्यामध्ये 30 टक्के आरक्षण स्त्रियांसाठी होते ते संसदेमध्ये सादर करण्यात आले. ते लोकसभेत पास झाले पण राज्यसभेत अतिशय कमी मतांनी फेटाळले गेले. त्यासाठी असे कारण देण्यात आले की, यामध्ये केंद्र सरकार जे क्षेत्र विषय राज्यसरकारांचा आहे त्यात ढवळाढवळ करीत आहे. हे पाऊल उचलण्यामध्ये राजकीय क्षमता आहे हे लक्षात आल्यामुळे राजीव गांधीच्या नेतृत्वाखाली कांग्रेस पक्षाने 30 टक्के जागा पंचायतीराज मध्ये स्त्रियांसाठी राखून ठेवल्या पण नंतर महत्वाच्या राजकीय पक्षांनी निर्विवाद पाठींबा दिल्यामुळे 73 व 74 व्या घटनादुरूस्तीचे कायद्यात रूपांतर झाले (1992) आणि याची खातरजमा झाली की 33 टक्के म्हणजेच 1/3 जागा पंचायत राज संस्था आणि महापालिकामध्ये प्रत्यक्ष निवडणूकीव्दारे स्त्रियामधून भरल्या जातील. एप्रील 1993 पर्यंत भारतातील सर्व राज्यांनी या दुरुस्त्यावर शिक्कोमार्तब केले आणि

LATUR
Scanned with OKEN Scanner

एप्रील 1994 पर्यंत राज्यसरकारांनी त्यांचे पंचायत कायदे, घटनेच्या दुरुस्त्यांनुसार आवश्यक कायद्यांमध्ये रूपांतरीत केले.

स्त्रियांसाठी एकतृतियांश आरक्षण सर्वसाधारण मतदारसंघात झाले त्याचप्रमाणे मागास जाती आणि जमाती यांच्यासाठी सुध्दा त्यांच्या मतदार संघाचे आरक्षण झाले हे सर्व प्रत्यक्ष निवडणूकीतून भरण्याचे ठरविण्यात आले. या दुरुस्त्यांमध्ये स्त्रियांच्या चळवळी आणि त्यांच्या मागणीचे प्रतिबिंब आहे. भारतीय लोकशाही मध्ये या घटनेने नवचैतन्य आले. तळागाळातील स्त्रियांचे सक्षमीकरण करणे अत्यंत गरजेचे होते. महिलांसाठी आरक्षण आणि राजकारणातील त्यांचा सहभाग: - 73 व्या घटना दुरूस्तीमंध्ये महिलांना मिळालेले 33 टक्के आरक्षण महिला सशक्तीकरणाच्या दृष्टीने एक महत्वाचे पाऊल होते. सत्तेमध्ये सहभाग मिळाल्याने केवळ महिलांनाच त्याचा फायदा झाला असे नाही तर राष्ट्राला सुध्दा त्यांच्या ज्ञानाचा व अनुभवाचा फायदा झाला. संयुक्त राष्ट्राची एजेन्सी यु. एन. एफ. पी. ए. च्या मते महिला आरक्षणामुळे केवळ महिलांच्या सशक्तीकरणांचे व्दार मोकळे झाले नसुन स्त्रियांमध्ये नवीन चेतना, नवीन सामर्थ्य आणि आशेच्या किरणांचा संचार झाला आहे. यामुळे 15 लाख स्त्रियांना ग्राम पंचायत व शहरी भागात निवडणूक लढविण्याचा अधिकार मिळाला. ग्राम पंचायतीमध्ये निवडणूक लढविल्यामुळे 33 टक्क्यावरून 40 टक्क्यावर महिला सरपंच पोहचले आहेत. ग्रामपंचायत व नगरपालिकेमध्ये कर्नाटकात 43 टक्के केरळमध्ये 39 टक्के प. बंगालमध्ये 37 टक्के एवढी संख्या नोदविलेली आहे. देशातील ग्रामपंचायतीमध्ये एकुण 28 लाख प्रतिनिधी आहेत त्यात 12 लाख महिला सरपंच आहेत. यांच्या कार्यामुळे ग्रामीण विकास आणि स्त्रियांच्या सशक्तीकरणांस एक दिशा प्राप्त होते आहे.

73 व 74 व्या घटनादुरूस्तीने स्त्रियांना देशातील निर्णय प्रक्रियेत सहभागी करून घेतले. ग्रामपंचायतीमध्ये मोठ्या संख्येने स्त्रिया निवडून आल्या आहेत. 1995 च्या ग्रामपंचायतीच्या निवडणूकीत उत्तर प्रदेशात एकुण 799780 प्रतिनिधी निवडून आले त्यात महिलांची संख्या 120591 एवढी होती. पंचायत समिती सदस्यांची एकुण संख्या 59991 एवढी होती तर त्यात महिलांची संख्या 13865 एवढी होती. जिल्हा परिषदेत निवडून आलेले एकुण सदस्य 2687 होते तर त्यात महिला सदस्या 634 एवढया होत्या. मध्य प्रदेशात ग्रामपंचायत मध्ये निवडून आलेले एकुण सदस्य 474351 एवढे होते तर महिलांची संख्या 74470 एवढी होती. पंचायत समिती मध्ये एकुण 9097 प्रतिनिधीमध्ये 1371 महिला होत्या. जिल्हा परिषदेमध्ये एकण 1036 मधून 150 महिला होत्या. महाराष्ट्रामध्ये ग्रामपंचायत मध्ये एकुण 303545 एवढे सदस्य निवडून आले होते पैकी 101182 महिला होत्या. पंचायत समिती मध्ये 1174 आणि जिल्हा परिषदेमध्ये 587 स्त्रिया निवडून आल्या होत्या. वरील आकडेवारीवरून हे स्पष्ट होते की 73 वी घटना दुरूस्ती मुळे स्त्रियांना केवळ राजकारणात प्रवेश मिळाला नाही तर नेतृत्व करण्याची फार मोठी संधी मिळाली.

राजकीय आरक्षणामुळे स्त्रियांवर झालेले परिणाम महिलांचा राजकीय सहभाग वाढल्यामुळे समाजात त्यांचा दर्जा वाढलेला आहे. त्यांना सन्मान आणि महत्व प्राप्त झाले आहे. पुरूषांनी स्त्रियांच्या अनुभव, दक्षता आणि योजनांना मानलेले आहे. पुरूषांच्या दृष्टिकोणातही परिवर्तन होवू लागले आहे. त्यामुळे मुलींचे शिक्षण, महिला विकास, लैंगिक

Scanned with OKEN Scanner

समानता अशा प्रगतीशिल विचारांचे ते समर्थन करतांना आढळतात. पंचायत राज्यात महिलांच्या सक्रिय भूमिकेमुळे अनेक राज्यात त्यांच्यावर होणाऱ्या वाईट चालीरितींना पायबंद बसलेला आहे. उदा. तामिलनाडू मधील सेलम जिल्ह्यात हुंडा पध्दती, बाल विवाह आणि गुन्हेगारी प्रवृत्तींना आळा घालण्याचे कार्य महिला सरपंचांनी केलेले आहे. मध्यप्रदेशातील सिहोर जिल्हयात जमूना तलब गावाच्या संरपंच श्रीमती गीतादेवी तीस-यांदा त्या गावाची सरपंच झाल्या आहेत." मध्यप्रदेशात आणि कर्नाटकातही महिलांचे राजकिय क्षेत्रातील पदार्पण आशादायी ठरलेले आहे. निरक्षरता, दारिद्य आणि अनेक ज्वलंत समस्यांना सोडविण्याचे कार्य महिला सरपंचांनी केल्याचे आढळते. महिला आरक्षणामुळे स्त्रिया कुटुंबातही महत्वपूर्ण झाल्या आहेत. कुटुंबातील कोणतेही निर्णय त्यांना विचारून घेतले जातात. त्यांचा आत्मविश्वास वाढलेला आहे. शिक्षण, आरोग्य, पोषणासारख्या मुलभुत आवश्यकतांच्या पूर्तीकरीता त्या प्रयत्न करतांना दिसतात. सुरूवातीला पुरुषांच्या छत्रछायेखालीच कार्यभार सांभाळतील असा शिक्का त्यांना मारला गेला होता. परंतू त्यांनी ही उक्ती खोटी ठरवत स्वतःचा ठसा उमटवलेला आहे. स्त्रियांना निवडणूकीत उभे राहतांना आता भिती वाटत नाही. कुटुंबातील इतर सदस्य त्यांना पाठींबा देतात. त्यांचा जनसंपर्क वाढलेला आहे. पक्षाच्या महत्वपूर्ण निर्णयामध्ये त्यांचेही मत मागीतले जाते. त्यांच्या गावाच्या प्रभागाच्या विकासासाठी प्रयत्न पहाता 'women are better administrative than men' या उक्तीचा खरा अर्थ कळतो.

गांवामध्ये स्त्रियांच्या व बालकांच्या दशेत सुधार व्हावा म्हणून महिला प्रतिनिधी प्रयत्न करीत आहेत. ग्रामपंचायतीचे बजेट सादर करतांना त्या आपली भूमिका कौशल्याने पार पाडीत आहेत. पंचायती राज मध्ये महिलांचा सहभाग गावांच्या विकासासाठी उत्तरोत्तर प्रगतीकारक ठरत आहे. गावात सामाजिक आर्थीक परिवर्तन होत आहेत. गावाचा विकास होणे म्हणजे पर्यायाने देशाचा विकास होणे होय.समाजातील धार्मिक अंधः विश्वास, पडदाप्रथा, भ्रष्टाचार यामध्ये महिलांचे योगदान महत्वपूर्ण आहे. खाद्य सुरक्षा, उर्जा सुरक्षा, पर्यावरण सुरक्षा, नैसर्गिक संसाधनांचा प्रबन्ध करण्यातही महिला प्रतिनिधी आघाडीवर आहेत. आता हे स्विकारले जावू लागले आहे की, स्त्रियांमध्ये योग्यता, क्षमता आणि दक्षता असते, जर त्यांना योग्य संधी मिळाली आणि समानतेने आपल्या क्षमतांना वापरण्याची मुभा मिळाली तर त्या देशाच्या समाजाच्या विकासात महत्वपूर्ण योगदान देवू शकतात. यात काही शंकाच नाही की जर वरच्या स्तरांवर स्त्रियांच्या राजकिय सहभागाला थांबविले गेले तर सार्वजनिक जिवन आणि राष्ट्र निर्माणाकरीता महिलांच्या सहकार्याचा पूर्ण लाभ राष्ट्राला प्राप्त होणार नाही आणि महिला सशक्तीकरणांस सार्थ बनविण्यास खुप वेळ लागू शकेल म्हणून आतापर्यंत आलेल्या अडचणींवर मात करत स्त्रिया इथवर पोहचल्यात तसेच आता आपली सक्रियता वाढविण्यासाठीउपलब्ध संधीचा आधी उपयोग करून महिला सशक्तीकरणांस सार्थक बनविले पाहिजे. आपल्या कार्यक्षमतेवर आणि कुशलतेवर उठत असलेल्या प्रश्नचिन्हाला वेळीच मिटविले पाहीजे आणि नवनवीन आव्हानात्मक भूमिकांचा स्विकार करत समाज व राष्ट्राचे सशक्तीकरण करण्याचा मार्ग प्रशस्त केला पाहिजे. महिलांचे सशक्तीकरण हेच संपूर्ण राष्ट्राचे व कमकुवत घटकांचे सशक्तीकरण होय.

Scanned with OKEN Scanner

LATUR

MANJARA CHARITABLE TRUST'S
SMT. SUSHILADEVI DESHMUKH SENIOR COLLEGE, LATUR

Project Work / Field Work

## *Certificate*

This is to certify that,

Mr./Mrs. Vishnu Bhadange, Rajnandini Thakur, Balaji Suvarnkar, Shailesh Kamble Irfan Pathan

has successfully completed the Project Work/ Field Work entitled "Women's Political Participation and Women's Empowerment"

Conducted by the Department of Political Science in the academic year 2022-23.

Project Guide

Head of the Department

Scanned with OKEN Scanner

LATUR

# श्रीमती सुशीलादेवी देशमुख वरिष्ठ महाविद्यालय लातूर

शैक्षणिक वर्ष 2022-2023

राज्यशास्त्र विभाग

प्रकल्प लेखन

प्रकल्पाचे शिर्षक

## ७३ वी घटनादुरुस्ती व ग्रामसभेची भूमिका

मार्गदर्शक

प्रा. शिवाजी मोहाळे

प्रा. शंकर चव्हाण

प्रकल्प लेखनकार.

बी.ए.व्दितिय वर्षाचे विद्यार्थी.

1 ) वैष्णवी सलगर

2 ) केतन सरवदे

3 ) अयुब सय्यद

4 ) मुबशिर सय्यद

5 ) बबलु शेख

Scanned with OKEN Scanner

LATUR

## 2 ) 73 वी घटना दुरुस्ती व ग्रामसभेची भूमिका

### उद्देश :-

1 ) ग्रामसभेच्या कार्याचा व अधिकाराचा अभ्यास करणे.

2 ) ग्रामसभेची संरचना समजून घेणे.

3 ) विविध शासकीय योजनांची माहिती देणे.

### निष्कर्ष :-

1 ) ग्रामस्थांचा ग्रामसभेतील सहभाग वाढला .

2 ) महिलांचा निर्णय प्रक्रियेतील सहभाग वाढला नाही.

3) विविध शासकीय योजनांच्या माहितीचा अभाव आहे.

Scanned with OKEN Scanner

# ७३ वी घटनादुरुस्ती व ग्रामसभेची भूमिका

LATUR

वैष्णवी सलगर, केतन सरवदे, अयुब सय्यद, मुबशिर सय्यद, बबलु शेख ( बी.ए.व्दितिय वर्ष )

प्रस्तावना:-

प्राचीन ग्रीक नगरराज्यात प्रत्यक्ष लोकशाही व लोक सहभागातून राज्यकारभारातील निर्णय निर्धारण प्रक्रिया चालत असते. प्रत्यक्ष लोकशाही व्यवस्थेत प्रत्येक नागरिकाला व्यक्तिगतरित्या शासकीय यंत्रणेत सहभाग घेता येतो. आज ही ग्रामपंचायत मधील ग्रामसभेच्या माध्यमातून प्रत्यक्ष लोकशाहीचे अवलंबलेली जाते. या ग्रामसभेत गावातील सर्व प्रौढ मतदाराचा गावाच्या विकासाच्या दृष्टीने कार्य करताना व निर्णय घेताना सहभाग असतो, ७३ व्या घटनादुरुस्तीने ग्राम पंचायतीचा विस्तार झाला. विकेंद्रीकरणाने ग्रामसभेला महत्व प्राप्त झाले. यातून ग्रामसभा गावातील निर्णय घेणारी संस्था बनली. ७३ वी घटनादुरुस्ती व ग्रामसभा

पंचायतराजमधील सर्वात खालच्या पण महत्त्वाच्या टप्प्याला ग्रामपंचायत म्हणतात. प्रत्येक राज्यात ग्रामपंचायत स्थापनेसंबधी वेगवेगळे कायदे अस्तित्वात आले. शिवाय राज्यांनुसार त्यांची नाव व रचना बदलते. घटकराज्यांना ग्रामपंचायती स्थापन करण्याचा अधिकार असल्याने ग्रामपंचायतीच्या रचनेत व स्वरुपात भिन्नता आढळते. या ग्रामपंचायतीचा कारभार सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवक ह्यांच्या मदतीने केला जातो. तसेच ग्रामपंचायतेची ग्रामसभा ही कार्यकारी समिती आहे. १९९२ साली ७३ व्या घटनादुरुस्तीने कायद्याने ग्रामपंचायतीला घटनात्मक दर्जा देऊन ग्राम पंचायत सशक्त बनवली. या घटनादुरुस्तीने

वर्षातून ४ ग्रामसभा घेणे बंधनकारक बनले.

लोकसहभागातून राज्यकारभाराचे निर्णय घेतले जातात त्या पद्धतीला प्रत्यक्ष सरकार अथवा प्रत्यक्ष लोकशाही असे म्हणतात. याचप्रमाणे ज्या कारभारात लोकांनी निवडून दिलेले प्रतिनिधी सहभागी होतात आणि राज्यकारभाराचे निर्णय घेतात त्या कारभार पद्धतीला अप्रत्यक्ष सरकार किंवा प्रतिनिधीचे

Scanned with OKEN Scanner

LATUR

सरकार असे म्हटले जाते. हीच पद्धती ग्राम पंचायतीतील ग्रामसभेत अवलंबली जाते. ग्रामसभा म्हणजे पंचायतराजांचा प्राथमिक एकक. प्रत्येक गावातील त्या गावातील प्रौढ मतदारांना एकत्र करून ही ग्राम सभा तयार केली जाते. म्हणजेच, गावात प्रत्येक मतदार ग्राम सभासद असतो.

ग्रामसभा या संकल्पनेत ग्राम आणि तिची सभा अंतर्भूत आहे. स्वतंत्र भारताच्या राज्यघटनेने ग्राम आणि ग्रामसभा याबाबत कलम २४३ अ मध्ये पुढीलप्रमाणे तरतूद केली आहे ७३ व्या राज्यघटनादुरुस्तीनुसार १९९३ साली ग्रामसभेला संवैधानिक दर्जा प्राप्त झाला. असे असले तरीही, गावसंबंधीत कामे मंजूर करण्याचा अधिकार ग्रामसभेला नसतो. पण या सभेस नैतिक अधिकार जास्त असतो. ग्रामसभेचे गावाच्या विकासात महत्वाचे योगदान असते. हे तळागाळातील लोकांचा आवाज स्पष्ट करण्याचे एक माध्यम आहे. तसेच महाराष्ट्र शासनाने ग्रामसभा संदर्भामध्ये ग्रामपंचायत अधिनियम १९५८ मध्ये काही सुधारणा करून १६ ऑक्टोबर २००२ रोजी ग्रामपंचायत 'सुधारणा अध्यादेश' काढलेला आहे. त्यामुळे ग्रामसभांना अनन्य साधारण महत्त्व दिलेले असून पूर्वीच्या चार ग्रामसभा ऐवजी एकूण सहा ग्रामसभा अनिवार्य करण्यात आलेल्या आहेत. तसेच महिलांच्या ग्रामसभा घेणेही बंधनकारक आहे. ग्रामसभांना या दुरुस्तीमुळे इतरही विशेष अधिकार देण्यात आलेले आहेत.

ग्रामसभा हे प्रत्यक्ष कारभाराचे उदाहरण असून ग्रामपंचायतीच्या हद्दीत असणाऱ्या गावातील व वाड्यावस्त्यामधील ग्रामपंचायतीचे मतदार हे ग्रामसभेचे सदस्य असतात. ग्रामसभेत गावातल्या लोकांनी एकत्र येवून लोकांच्या गरजा काय आहेत त्या ग्रामपंचायतीला सांगाव्यात आणि गावांच्या भल्यासाठी कोणत्या योजना अग्रक्रमाने घ्याव्यात हे सुचवण्याचे कार्य करावे. ग्रामसभेला एक अध्यक्ष असतो. निवडणूक झाल्यानंतरच्या पहिल्या ग्रामसभेचा अध्यक्ष व आर्थिक वर्षातील पहिल्या ग्रामसभेचा अध्यक्ष हा सरपंच असतो.

ग्रामसभेची गावाच्या विकासातील भूमिका :- पंचायत राजव्यवस्थेमध्ये ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हापरिषद ही ग्रामीण विकासाची त्रिसुत्री आहे. गाव पातळीवर ग्रामविकासात ग्रामपंचायतीची भूमिका ही अत्यंत महत्वपुर्ण असते. ग्रामसभा ही प्रत्यक्ष लोकशाहीचे प्रतिबिंब असून आज ग्रामपंचायतीच्या व्यवस्थेत ग्रामसभेला अनन्य साधारण महत्त्व आहे. ग्रामसभा या लोकशाही सक्षमीकरणाच्या दृष्टीने कार्य करीत असून ७३ व्या घटनादुरुस्ती नुसार ग्रामसभेला घटनात्मकदृष्ट्या अधिकार बहाल करण्यात आलेले आहेत, अशा या ग्रामसभा गावातील लोकांच्या प्रतिबिंबाचे प्रतिनिधीत्व करतात.

Scanned with OKEN Scanner

१. ग्रामसभा ही लोकांना शासन कारभारात सहभागाची संधी देते. यामुळे गावाच्या विकासातील निर्णय प्रक्रियेमध्ये गावातील सर्व लोकांचा सहभाग होतो. यातून लोकशाहीच्या विषयी लोकांच्या मनात आस्था निर्माण होते. लोकशाहीमध्ये मतदार हा राजा असतो व तो ख-या अर्थाने ग्रामसभेच्या माध्यमातून आपल्या अधिकाराचा वापर करतो, ग्रामसभेतून राज्यघटनेविषयी व लोकशाहीच्या प्रक्रियेविषयी लोकांच्या मनात आस्था निर्माण होते व ही आस्थाच लोकशाहीच्या सक्षमीकरणासाठी महत्वाची असते.

२. विकेंद्रीकरणाची लोकशाही प्रक्रिया प्रत्यक्षात ग्रामसभेच्या मार्फत होते. लोकशाही व्यवस्थेतील राजकीय प्रक्रियेतील निर्णय क्षमतेमध्ये व विकासात प्रत्यक्ष मतदारांना सहभाग घेता येत नाही. पण ग्रामसभा हे एकमेव असे व्यासपीठ आहे की जेथे मतदारांना प्रत्यक्ष सहभाग घेऊन गावाच्या विकासाचा नियोजीत आराखडा तयार करण्याच्या प्रक्रियेत सहभाग घेता येतो. तसेच आपल्या अधिकाराचा वापर करून विकासाला बाधक असणा-या गोष्टीबाबत असंमती दाखवता येते.

३. ग्रामसभेत गावातील सर्व मतदार हे सदस्य असून त्यांना सदस्य या नात्याने अधिकार बहाल केलेले असतात. दलित, आदिवासी, महिला व तरुणांच्या आशा, आकांक्षा, व्यथा, वेदनांना वाव देणारे, गावाचे शहाणपण, सदिच्छा व कर्तृत्व व्यक्त ग्रामसभात केले जाते, आवाजहीन लोक, दुर्बल घटक, आणि महिलावर्ग यांचा प्रामुख्याने तळागाळातील समुदायामध्ये यात समावेश केला जातो. सामाजिक, आर्थिक अशी लोकाभिमुख व्यवस्था ग्रामसभेतून प्रकट होते.

४. ग्रामसभेला शासनाद्वारे राबविल्या जाणा-या विविध योजनांच्या लाभार्थीची निवड करण्याचा अधिकार दिला आहे. तसेच विविध योजनांची कार्यप्रणालीचे निरिक्षण करण्याचा अधिकार असल्यामुळे ग्रामसभा ही शासकीय योजनांचा लाभ तळागाळातील वंचित घटकांना पोहचविण्याचे कार्य करते.

५. ग्रामसभा ही ग्रामीण विकासात फक्त शासकीय कागदपत्र पाहणे, मंजुरी देणे, ठराव करणे याबाबतच नसून गावातील स्थानिक समस्या व त्यांच्याविषयीचे प्रश्न उपस्थित करून त्याच्याबाबत साधक बाधक चर्चा करणारे व्यासपीठ आहे.

६. ग्रामसभेच्या माध्यमातून स्थानिक पातळीवरील अनु. जाती जमातींना विकासाच्या प्रक्रियेमध्ये सहभाग करून घेतला जातो. व तसेच त्यांना योग्य नेत्वाची संधी दिली जाते. समाजातील अस्पृश्य जाती

Scanned with OKEN Scanner

... घटक आहे. अशी भावना निर्माण होते. ग्रामसभेतून महिला सक्षमीकरणाची प्रक्रिया सुरु झालेली दिसते. महिला या विकासातील महत्वपूर्ण घटक असून ग्रामसभेत त्यांच्या निर्णय प्रक्रियेला महत्व आहे. अशा प्रकारे अनु. जाती जमाती व महिलांचे नेतृत्व ग्रामसभेतून निर्माण होते

LATUR

७. ग्रामसभेच्या माध्यमातून लोकांचा सहभाग गावाच्या कार्यप्रणालीत होत असतो. तसेच निर्णय क्षमतेत त्यांची भूमिका ही महत्वपूर्ण असते. या पध्दतीने गावातील लोकांना राजकीय प्रक्रियेचे प्रशिक्षण अनुभवातून ग्रामसभेच्या माध्यमातून प्राप्त होते. ८. ग्रामसभा सर्व गावाचे व्यासपीठ असून संवादातून एकात्मता कायम ठेवण्याचे साधन आहे. ग्रामसभेमध्ये सर्व मतदार सारखे असतात व प्रत्येक व्यक्तीला बोलण्याचा व आपली मते मांडण्याचा अधिकार आहे. कमकुवत घटकाला गावच्या विकासाच्या मुळ प्रवाहामध्ये सामिल करून घेतल्यास खऱ्या अर्थाने गावाचा विकास साध्य करता येईल आणि या विकासाला एक विशिष्ट दिशा प्राप्त करून देते.

समारोप :-

एकंदरीत ग्रामसभा गावातील सामुदायिक कर्तव्यांचे व आशा- आकांक्षांचे प्रतिक आहे. कायद्याने जरी प्रत्यक्ष कामे मंजूर करण्याचा ग्रामसभेला अधिकार नसला तरी, तिचा नैतिक अधिकार खूप मोठा असून तिच्या विरूद्ध ग्रामपंचायतीला जाता येणार नाही. असे असले तरी ग्रामसभा यशस्वी होण्यासाठी सर्वसाधारण ग्रामस्थ विशेषतः शेतमजूर व स्त्रिया यांना सोयीचा दिवस व वेळ ग्रामसभेसाठी निवडावी, ग्रामसभेची तारीख वेळ आणि ग्रामसभेपुढील विषय यांना व्यापक पूर्व प्रसिद्धी दयावी, दवंडीद्वारे, लाउडस्पीकरवरून, ग्रामपंचायत कार्यालय व गावातील मोक्याच्या जागी मोठे ठळक फलक लावून प्रसिद्धी करता यावी, वर्गात ग्रामसभेची माहिती सांगून मुलांना आपल्या पालकांना सभेस पाठविण्यास प्रवृत्त करावे, ग्रामसभेपूर्वी गावातील स्वयंसेवी संस्था, अंगणवाडी सेविकेमार्फत महिलामंडळाला ग्रामसभेची माहिती देण्यात आली तर महिलांचा सहभाग ग्रामसभेत वाढेल, ग्रुप - ग्रामपंचायत असल्यास प्रत्येक गावात आळीपाळीने ग्रामसभा घेतली जावी, एरवी गावातील वेगवेगळ्या वस्त्या किंवा वाड्यांवर/पाड्यांवर आळीपाळीने ग्रामसभा घेण्यात यावी अशा पद्धतीने ग्रामसभा यशस्वी केल्या जाव्यात.

Scanned with OKEN Scanner

MANJARA CHARITABLE TRUST'S

SMT. SUSHILADEVI DESHMUKH SENIOR COLLEGE, LATUR

Project Work / Field Work

## *Certificate*

This is to certify that,

Mr./Mrs. Vaishnavi Salgar, Keten Sarwade, Ayyub Sayyad, Mubshir Sayyed, Bablu Shaikh

has successfully completed the Project Work/ Field Work entitled

"73rd Constitutional Amendment and Role of Gram Sabha"

Conducted by the Department of Political Science in the academic year 2022-23.

Project Guide

Head of the Department

Scanned with OKEN Scanner

# श्रीमती सुशीलादेवी देशमुख वरिष्ठ महाविद्यालय लातूर

शैक्षणिक वर्ष 2022-2023

राज्यशास्त्र विभाग

प्रकल्प लेखन

प्रकल्पाचे शिर्षक

## पंडित जवाहरलाल नेहरू यांचे धर्मनिरपेक्ष विचार

मार्गदर्शक

प्रा. शिवाजी मोहाळे

प्रा. शंकर चव्हाण

प्रकल्प लेखनकार.

बी.ए.तृतीय वर्षाचे विद्यार्थी.

1) अरविंद कांबळे
2) आशिष घोडके
3) आशिष जाधव
4) भाग्यश्री गिरी

Scanned with OKEN Scanner

## 1 ) पंडित जवाहरलाल नेहरू यांचे धर्मनिरपेक्ष विचार

### उद्दिष्टे

1 ) धर्म निरपेक्षता संकल्पना भारतीय समाजात रुजली कशी ते समजावणे

2 ) पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या विचारांची ओळख करून देणे

### निष्कर्ष

1 ) धर्मनिरपेक्ष विचार रुजले आहेत

2 ) धर्मनिरपेक्ष विचाराचा प्रसार झाला आहे

Scanned with OKEN Scanner

# पंडित जवाहरलाल नेहरू यांचे धर्मनिरपेक्षतेसंबंधीचे विचार

अरविंद कांबळे, आशिष घोडके,आशिष जाधव,भाग्यश्री गिरी ( बी.ए.तृतीय वर्ष )

LATUR

**प्रस्तावना :-**

पंडित जवाहरलाल नेहरू हे भारताचे पहिले पंतप्रधान होते. आधुनिक भारताची घडण नेहरूंच्या नेतृत्वाखाली झाली. स्वातंत्र्योत्तर नवभारताचे स्वप्न पाहणारे नेहरू नवभारताचे शिल्पकार होते. राष्ट्रीयतेच्या मर्यादा ओलांडून मानवतेच्या कल्पनाचा-ऐहिक आणि सांस्कृतिक विकासाचा त्यांनी सदैव ध्यास घेतला होता. नेहरू हे खऱ्या अर्थाने विश्वमानव होते. भारतातील अर्वाचीन युगातील पहिले तत्त्वचिंतक राज्यकर्ते होते. हिंसात्मक युद्धाला विरोध, जागतिक शांततेचा सदैव पुरस्कार करणारे नेहरू पुढे ध्यातिदूतऽम्हणून ओळखले गेले. त्यांचे संपूर्ण जीवन मार्क्स आणि गांधी यांच्या विचार व चिंतनाने फुलले यातुनच त्यांनी नवभारताचे शिल्प खोदण्याचा प्रयत्न केला. शेकडो वर्षानंतर भारताला आधुनिक वैज्ञानिक युगात आणण्याचा ध्यास बाळगणारे भारतीय मानसिकतेला नवा आकार देण्याचे स्वप्न पाहणारे नेहरू नवभारताचे शिल्पकार म्हणून अमर झाले. जागतिक शांततेचा पुरस्कार करणाऱ्या नेहरूंनी पंचशीलचे धोरण प्रसृत केले. नेहरू हे हाडाचे लोकशाहीवादी होते. पाश्चिमात्य उदारमतवादाचे संस्कार घेऊन त्यांनी व्यक्तिस्वातंत्र्याला सर्वोच्च स्थान दिले. मात्र रशियाच्या प्रभावातून जगभरच्या भांडवलशाहीमधील शोषण, विषमता यांच्या अनुभवातून नेहरू समाजवादाचे भोक्ते झाले. स्वातंत्र्यपूर्व काळापासून ते किसान नेते होते. शेती क्षेत्राचे मूलभूत परिवर्तन करण्याच्या हेतूने त्यांनी जमिनदारीच उच्चाटन, कूळकायदे, सिलिंग अॅक्ट अशा धोरणांची आखणी केली. नेहरू अंधश्रद्धा, अनिष्ट रुढी, परंपरा, अविवेकी धार्मिकता, कर्मकांड यातून सामान्य जनाची होणारी ससेहोलपट पाहून दुःखी होत. त्यांनी धर्मनिरपेक्ष भारताची उभारणी करण्याच्या दिशेने प्रस्थापितांचा कॉंग्रेसमधील वरिष्ठांचा अगदी गांधीचाही काही बाबत होणारा रोष पत्करुन समाजाची व देशाची वाटचाल करण्याचा प्रयत्न केला. अल्पसंख्याकांना आपल्या हिताची शाश्वती वाटावी याची नेहरू नेहमी काळजी घेत असत. त्यांनी स्वीकारलेल्या ध्येयधोरणांची बहुतांशी नेहरू वादावरच आधारलेले आहे. स्वातंत्र्योत्तर काळात भारताच्या एकंदर जनजीवनावर नेहरूजींच्या विचारांचा प्रभाव पडलेला आहे.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये :-**

१. पंडित जवाहरलाल नेहरुंचे धर्मनिरपेक्षतेसंबंधीचे विचार अभ्यासणे.

२. पंडित जवाहरलाल नेहरुंचे धार्मिक, अंधश्रद्धा, रूढी, परंपरा विषयीचे विचार अभ्यासणे.

Scanned with OKEN Scanner

LATUR

## संशोधन पद्धती :-

प्रस्तुत संशोधनामध्ये संशोधकाने दुय्यम स्त्रोतांचा वापर केलेला असून त्यामध्ये प्रकाशित, अप्रकाशित संदर्भ ग्रंथ, नियतकालिके, इंटरनेट इत्यादींचा वापर केलेला आहे.

## पंडित नेहरुंचे धर्मनिरपेक्षतेसंबंधीचे विचार :-

पं. नेहरूंच्या स्वतःचा जीवनविषयक दृष्टिकोन सुरुवातीपासूनच बुद्धीवादी, शास्त्रीय आणि इहवादी असा होता. जीवनातील रहस्यवादाला, अध्यात्मवादाला, धार्मिकतेला, • धार्मिक अंधश्रद्धांना त्यांनी नेहमीच विरोध केला होता. पं. नेहरू स्वभावतः धार्मिक नव्हते त्यांना धर्म, धार्मिक विधी, पाप-पुण्य, स्वर्ग-नरक इत्यादींचे कधीच आकर्षण नव्हते. आध्यात्मिक प्रश्नांपेक्षा जीवनातील भौतिक प्रश्नांचा विचार करणे त्यांना महत्त्वाचे वाटत होते. त्यामूळेच त्यांनी सार्वजनिक जीवनाचा राजकारणाचा राजकीय व्यवस्थेचा विचार धर्मनिरपेक्ष दृष्टिकोनातून केला होता. त्यांचे राष्ट्रवाद, लोकशाही, समाजवाद इत्यादीसंबंधीचे विचारही धर्मनिरपेक्ष असेच होते. पं. नेहरुंनी धर्मनिरपेक्षतेचा स्वीकार केला होता याचा अर्थ ते धर्म विरोधी होते असा होत नाही. त्यांचा जीवन विषयक दृष्टिकोण इहवादी होता. परंतु धर्माचे सामाजिक मूल्य आणि सामर्थ्य त्यांना मान्य होते. त्यांचा विरोध होता तो धार्मिक अंधश्रद्धा आणि अयोग्य अमानुष अशा रूढी परंपरा आणि चालीरितींना.पंडित नेहरुंनी आपल्या धर्मनिरपेक्षतेच्या संकल्पनेत धार्मिक स्वातंत्र्य, धार्मिक समता आणि धर्म सहिष्णुता या तत्त्वांना महत्त्व दिले. भारतातील धर्मनिरपेक्षतेचा विचार आणि धर्मनिरपेक्ष राज्यव्यवस्था भारतातील भिन्न-भिन्न धर्माच्या लोकांमध्ये ऐक्य निर्माण करु शकेल यावर नेहरुंचा विश्वास होता. सर्व धर्माच्या लोकांना समान वागणुक आणि समान संधी देण्यात यावी ही नेहरुंची धर्मनिरपेक्षतेची संकल्पना भारताच्या राज्यघटनेत समाविष्ट करण्यात आली आहे. भारताचे राज्य धर्मनिरपेक्ष आहे असाही राज्यघटनेत उल्लेख करण्यात आला आहे. त्यानुसार भारताचा कोणताही अधिकृत असा राज्यधर्म नाही.

पं. नेहरूंचा स्वभाव हा कार्यकारणभावाचा शोध घेण्याकडे बुद्धीवादी दृष्टिकोनातून शहानिशा करून गोष्टीचा स्वीकार करण्याकडे होता. त्यांना व्रतवैकल्याचा तिटकारा होता. प्रार्थना करणे त्यांना मनोविकृती वाटे. धर्माच्या नावाने घडणाऱ्या रानटी कृत्यामुळे ते व्यथीत होत होते. भूक, दारिद्रय, पिळवणूक यांचे निवारण करण्यात धर्माचा काडीमात्र उपयोग नाही असे नेहरुंना वाटत होते. रुढी, परंपरा, धार्मिक समजुती यांच्या बेड्या दूर करणे, भारताला मुक्त करण्यासाठी गरजेचे आहे. असे त्यांचे मत होते. एका पत्रात त्यांनी आपल्या मूलभूत श्रद्धा कोणत्या याचा खुलासा केला होता. त्यात १) धर्मनिरपेक्षता, २) समाजवाद, ३) फसिस्ट विचाराला विरोध, ४) मानवी इतिहासाचा वैज्ञानिक दृष्टिकोण. गांधीजींनी १९३२ मध्ये जातीय निवाड्याच्या प्रश्नांवर उपोषण केले तेव्हा नेहरू चिडले त्यांनी आपली नापसंती व्यक्त

Scanned with OKEN Scanner

केली होती. पं. नेहरूंच्या मते, धर्म ही खाजगी बाब असून राज्याशी धर्माचा काहीही संबंध असू नये. नेहरूंचा हिंदूंच्या सांप्रदायिकतावादाला विरोध होता. तसेच ते मुस्लीम सांप्रदायिकतेचे टीकाकार होते. अशांना ते देशातील राष्ट्र विघातक, प्रतिगामी शक्ति समजत. नेहरूंच्या धर्मनिरपेक्ष विचारांमध्ये अनेक बाबतीत मुस्लीमांना अल्पसंख्य म्हणून झुकते माप दिलेले दिसून येते. त्यांच्यातील धर्मांधता समर्थनीय आहे. कारण ते आर्थिक व शैक्षणिक दृष्ट्या मागासलेले आहेत असे त्यांना वाटत होते.

नेहरूंची धर्मनिरपेक्षतेची संकल्पनाही राजकीय, भौतिक होती. तशीच सामाजिक आणि मानसशास्त्रीय देखील होती. ते पाश्चात्य धर्मनिरपेक्षतेचे समर्थक होते. सर्व धर्मांना समान दर्जा, समान संधी कोणत्याही धर्माला किंवा धार्मिक गटाला भेदभावाची वागणूक नसणे धर्मनिरपेक्षतेमध्ये नेहरूंना अपेक्षित होते. कोणत्याही एका धर्माला इतर धर्माच्या विरोधात विशेष हक्क असणार नाही, याबाबत ते सतर्क होते. त्यांच्या धर्मनिरपेक्षतेमध्ये सांप्रदायिक सद्भाव, एकोपा, बंधुभावाची जाणीव, एकतेची भावना या घटकावर भर होता. अशा धर्मनिरपेक्षतेसाठी विविध धर्मीयांमध्ये मानसशास्त्रीय अभिवृत्ती आवश्यक आहे असे त्यांचे प्रतिपादन आहे. त्यांनी परस्परामधील द्वेष, वाईट भावना, एकमेकांवर टीका करणे या गोष्टी सोडून दिल्या पाहिजे. या अभिवृत्ती व्यापक शिक्षणाचा कार्यक्रम लोकांच्या ठिकाणचा बौद्धीक दृष्टिकोण यातून जोपासला जाईल असे ते सुचवितात. विवाह, घटस्फोट, वारसा हक्क या क्षेत्रातही धर्मनिरपेक्षता यावी यासाठी नेहरू सामाजिक नागरी संहिता असावी या बाजूचे होते. घटनेच्या मार्गदर्शक तत्त्वामध्ये त्यांना स्थान ही दिले गेले

जातीयवाद्यांना नेहरूंचा इतका संताप येत असे की, हिंदू महासभेचे एक तत्कालीन नेते ना. भा. खरे म्हणतात की, 'नेहरू शिक्षणाने इंग्लिश, संस्कृतीने मुस्लीम आणि जन्माच्या अपघाताने फक्त हिंदू आहेत.' धर्मनिरपेक्षता हा नेहरूंच्या स्वभावाचा अविभाज्य भाग होता. धर्मांधतेच्या विरोधात कित्येकदा नेहरूंनी जीव धोक्यात घातला. दिल्लीतील दंगलीत मुस्लीमांचे प्राण वाचविण्यासाठी नेहरू स्वतः आपण पंतप्रधान आहोत हे विसरुन रस्त्यावर उतरत. 'मी जोपर्यंत पंतप्रधान आहे तोपर्यंत भारत कधीही हिंदू राष्ट्र बनू देणार नाही. 'भारत धर्मनिरपेक्ष राष्ट्रच राहील' असे ते सतत जाहीरपणे स्पष्ट करीत. जुलै १९५१ मधील काँग्रेस अधिवेशनात जाहीरपणे नेहरूंनी सांगितले की, 'प्रत्येक काँग्रेसमन धर्मनिरपेक्षतावादीच राहणार, मृत्यूपर्यंत अविचार सोडणार नाही याची कणभरसुद्धा शंका कोणी बाळगू नये.' हिंदू धर्मनिरपेक्ष, आधुनिक वैज्ञानिक दृष्टिकोन बाळगणारे व्हावेत असा नेहरूंचा आग्रह होता. त्यासाठी नेहरूंनी अविरत प्रयत्न केले. बहुतेक सर्व महत्त्वाच्या भाषणात धर्मनिरपेक्षता हा मुद्दा असायचाच. नेहरुंना एकूण धर्मविचारांचा एक प्रकारे तिटकाराच होता. विशेषतः संघटित धर्माची दहशत वाटते असे ते म्हणतात. लोकांना तोडण्याची फार मोठी शक्ती धर्मात आहे याची नेहरुंना जाणीव होती. नेहरुंच्या मते, धर्मनिरपेक्षता हे जातीयवादावर। जालीम औषध आहे. धर्मनिपेक्षता प्रामाणिकपणे राबविली तर जातीयवादी शक्ती वाढणार नाहीत.

LATUR

Scanned with OKEN Scanner

धर्मनिरपेक्षता म्हणजे काय? याबाबत नेहरुंचे म्हणणे असे होते की - १. जीवनाच्या राजकीय, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रामधून धर्म वेगळा करणे या क्षेत्राची व धर्माची फारकत करणे. धर्म ही व्यक्तिगत बाब समजणे. २. राज्यसंस्थेने कोणत्याही धर्माशी संलग्न असता कामा नये. ३. सर्व धर्मांना पूर्ण स्वातंत्र्य. ४. परधर्म सहिष्णुतेचे पालन. ५. धर्माचा विचार भेदाभेद न करता सर्व धर्माच्या अनुयायांना प्रगतीची समान संधी. ६. धर्मामूळे कोणाही व्यक्तीला वेगळी वागणूक दिली जाणार नाही. नेहरुंना असे वाटले की, शासनाने सामाजिक, आर्थिक कार्यक्रमावर लक्ष केंद्रीत केले की आपोआपच जातीयवाद मागे पडेल हे नेहरूंचे स्वप्नरंजन होते असा निष्कर्ष आज काढता येतो. मुस्लीमांना ागत करण्यासाठी धर्मनिरपेक्षता हे औषध सांगतात. नेहरू म्हणत की, भितीमूळे प्रामाणिक वरा जातीय वाद वाढतो आणि लबाड जातीयवाद राजकारणामुळे वाढतो. बहुसख्यांकाची रामधिता व जातीयवाद म्हणजे राष्ट्रवाद समजला जातो. ही नेहरुंची टीका आजही खरी आहे.राजेंद्र प्रसाद यांनी जावु नये असे नेहरुंचे मत होते. नेहरू आधुनिक विचारसरणीचे होते. आधुनिक जीवनातील संस्था आणि विज्ञानाचा वाढता प्रभाव यांच्यामूळे जीवनाच्या सर्व क्षेत्रातून धर्म व धार्मिक संस्था यांचे प्राबल्य कमी होत जाणे म्हणजे धर्मनिरपेक्षताङ अशी नेहरुंनी व्याख्या केली होती. नेहरुंना धर्म व राजकारण याची फारकत हवी होती. धर्माचे उच्चाटन सामाजिक जीवनातून व्हावे असे त्यांना वाटत होते. कारण धर्मामूळेच देशाची फाळणी स्वीकारावी लागली. धर्म माणसे तोडतो, जोडत नाही असे त्यांचे मत होते. नेहरूण सातत्याने सांगत आले की, मुस्लीम, हिंदू, शीख, शेतकरी यांच्या एकच समस्या आहेत. मजुर, कामगार, सुतार, चांभार, व्यापारी, जमीनदार यांच्या समस्या त्यांच्या व्यवसायाच्या आहेत, धर्मामूळे निर्माण झालेल्या नाहीत. नेहरुंना वाटत असे की, आर्थिक विकास वेगाने झाला की, जातीयवाद धर्मांधता दुर्बल होतील. हळुहळु नष्टच होतील याबाबत नेहरूण फार आशावादी वाटतात.

कराची येथील कॉंग्रेसच्या ठरावात सेक्युलॅरिझम या संकल्पनेचा "The state shall observe neutrality in regard to all religions" या शब्दात उल्लेख केला आहे. बहुधर्मीय भारतीय समाजामध्ये लोकशाही आणि सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक समता प्रस्थापित करावयाची झाल्यास सेक्युलॅरिझमचा स्वीकार करण्याशिवाय अन्य पर्यायच नाही हे नेहरुंनी ओळखले होते. प्रत्येक व्यक्तीला धर्मस्वातंत्र्य असले पाहिजे, पारलौकिक श्रद्धेवर आधारित धर्म विचार नाकारण्याचे स्वातंत्र्य असले पाहिजे असे नेहरू म्हणतात. १९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळाल्यानंतर धर्मनिरपेक्ष, समताधिष्ठीत लोकशाही शासन निर्माण करण्याच्या आपल्या ध्येयाचा नेहरुंनी पुनरुच्चार केला. सर्वत्र हत्याकांड चालु होते. निर्वासीतांच्या सूडाच्या घोषणा चालु होत्या अशा वेळी धर्मातील शासन निर्माण करण्याची नेहरूची घोषणा हे ही आश्चर्य होते. धर्मनिरपेक्षतेमध्ये धर्माला स्थान नाही, ईश्वराला स्थान नाही, अशी सार्वत्रिक समजूत आहे. ही समजूत दूर करण्यासाठी नेहरू पुन्हा पुन्हा सांगतात की, धर्मनिरपेक्षता धर्म विरोधी, ईश्वर विरोधी नाही. सामाजिक राजकीय क्षेत्रात धर्म विचारांचा हस्तक्षेप नसावा एवढेच सेक्यूलॅरिझमचे म्हणणे आहे. राजसत्तेमध्ये सर्व धर्मांकडे समान आदराने पाहण्याचे आपले धोरण राहील. तसेच भारत हे धर्मावर आधारलेले राष्ट्र नाही, भारत लोकशाही राष्ट्र आहे आणि लोकशाही राष्ट्रात सर्व धर्मांना सारखे स्वातंत्र्य आहे असे नेहरु म्हणतात.

LATUR

Scanned with OKEN Scanner

## निष्कर्ष :-

LATUR

पंडित जवाहरलाल नेहरूनी आपल्या धर्मनिरपेक्षतेच्या संल्कपनेत धार्मिक स्वातंत्र्य, धार्मिक समता आणि धर्म-सहिष्णुता या तत्त्वांना महत्त्व दिलेले दिसून येते. त्यामुळे च त्यांनी सार्वजनिक जीवनाचा, राजकारणाचा राजकीय व्यवस्थेचा विचार धर्मनिरपेक्ष दृष्टिकोनातुन केलेला दिसून येतो. त्यांच्या सामाजिक रुढी परंपरा अंधश्रद्धेला विरोध होता तसेच धर्म ही खाजगी बाब असून राज्याशी धर्माचा काहीही संबंध असु नये असे त्यांचे मत होते. सर्व धर्मांना समान संधी, समान दर्जा, कोणलाही भेदभावाची वागणुक नसणे हे धर्मनिरपेक्षतेमध्ये नेहरुंना आपेक्षित होते. विवाह, घटस्फोट, वारेसा हक्क या क्षेत्रातही धर्मनिरपेक्षता यावी यासाठी नेहरू सामाजिक नागरी संहिता असावी या बाजुचे होते. धर्मांधतेच्या विरोधात नेहरुंनी कित्येकदा जीव धोक्यात घातलेला दिसतो. त्यांना संघटित धर्माची दहशत वाटत होती. त्यांच्या मते धर्मनिरपेक्षता हे जातीयवादावर महत्त्वपूर्ण औषध आहे. धर्म माणसे तोडतो जोडत नाही असे त्यांचे मत होते. बहुधर्मीय भारतीय समाजामध्ये लोकशाही आणि सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक समता प्रस्थापित करण्यासाठी धर्मनिरपेक्षतेचा स्वीकार करणे आवश्यक आहे असे नेहरुंचे मत असलेले दिसते.

Scanned with OKEN Scanner

MANJARA CHARITABLE TRUST'S

## SMT. SUSHILADEVI DESHMUKH SENIOR COLLEGE, LATUR

## Project Work / Field Work

### *Certificate*

This is to certify that,

Mr./Mrs. Arvind Kamble, Ashish Ghodke, Ashish Jadhav, Bhagyashri Giri

has successfully completed the Project Work/ Field Work entitled

"Pandit Jawaharlal Nehru's Thoughts on Secularism"

Conducted by the Department of Political Science in the academic year 2022-23.

Project Guide

Head of the Department

Scanned with OKEN Scanner